**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**जिल्हा स्तरीय निवड समिती, द्वारा जिल्हा शल्यचिकित्सक कोल्हापूर.**

जाहिरात क्रमांक - ०६/२०१९ दि. ३१/१२/२०१९

## जाहिरात

कोल्हापूर जिल्हयातील खालील नमुद केलेल्या आरोग्य संस्थेतील वैद्यकीय अधिकारी गट-अ ची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरणेकरिता पात्र व ईच्छुक उमेदवारांकडुन अर्ज मागविणेत येत आहेत.

| पदनाम | जिल्हा शल्यचिकित्सक कोल्हापूर यांचे अधिनस्त सामान्य /उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे | जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडील रिक्त पदे |
|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस अर्हताधारक) | - | ५७ |
| वैद्यकीय अधिकारी विशेषतज्ञ/एमबीबीएस अर्हताधारक) | २३ | - |

**उमेदवारांना सूचना -**

१) वर नमुद केलेले पदसंख्येत पद नियमित पध्दतीने भरलेस बदल होण्याची शक्यता आहे
२) उमेदवारांनी शैक्षणीक पात्रतेचे मुळ कागदपत्र,आधार कार्ड,पॅन कार्ड,पासपोर्ट आकाराचे २ फोटो,सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती, स्वतः साक्षांकीत केलेल्या घेऊन जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, दसरा चौक, कोल्हापूर येथे हजर रहावे

- वैद्यकीय अधिकारी यांची सर्व रिक्त पदे भरेपर्यंत थेट मुलाखती प्रत्येक महिन्याच्या ०१ व १५ तारखेला घेणेत येतील. सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असलेस दुसऱ्या दिवशी मुलाखत घेणेत येईल.
- जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर
- नियुक्तीसाठी अर्ज भरुन दिलेनंतर कागदपत्रांची पडताळणी केली जाईल व पात्र उमेदवारांना निवड समितीसमोर मुलाखतीस उपस्थित रहावे लागेल.

३) वेतन - एमबीबीएस अर्हता धारक - एकत्रित दरमहा रु.५५,०००/- (पंचावन हजार)
विशेषतज्ञ अर्हता धारक - एकत्रित दरमहा रु.६५,०००/- (पासष्ठ हजार)
४) वयोमर्यादा - ५८ वर्षे पेक्षा अधिक नसावे.
५)नियुक्तीचे इतर अटी व शर्ती पहाणेसाठी http://arogya.maharashtra.gov.in या संकतेस्थळावर भेट द्यावी.

(डॉ.बी.सी.केम्पीपाटील)
जिल्हा शल्य चिकित्सक कोल्हापूर
तथा सदस्य सचिव जि.स्त.निवड समिती

# जाहिरात
## जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय कोल्हापूर
## वॉक इन इंटरव्युव्ह तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरणेबाबत
## थेट मुलाखत

मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत करणेत आलेल्या निवड समिती द्वारे आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळातंर्गत असलेल्या कोल्हापूर जिल्हयातील सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र येथील महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा (गट अ) यांची रिक्त पदे तदर्थ वैद्यकीय अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून भरावयाचे आहे.

१ सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यांसाठी किंवा सदर पदावर एम.बी.बी.एस. अर्हताधारक नियमित / बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांका पर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील. सदर कंत्राटी पद भरती करीता विशेषतज्ञ पदव्युत्तर पदवी/ पदवीका उमेदवारांना प्राध्यान्य देणेत येईल.

२ सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असलेने नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांसारखे म.ना.से. (रजा) नियम लागू राहणार नाहीत. तसेच ते विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतीही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. त्यांना वार्षिक वेतनावाढ अनुज्ञेय राहणार नाहीत.

३ सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असलेने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांना धारणाधिकार असणार नाही.

४ कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहित मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्य नियमित सेवेत जोडून दिली जाणार नाही.

५ केवळ तात्पुरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवा विषयक बाबींसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६ निवड झालेल्या तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांना मुख्यालयात रहाणे बंधणकारक आहे. तसेच त्यांची बायोमेट्रिक प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य आहे.

७ सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन / गैरव्यवहार केलेचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देणेत येणार नाही.

८ सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना सेवा काळात सेवा मुक्त व्हायचे असल्यास त्यांना १ महिन्यांची नोटीस किंवा १ महिन्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

९ शासन निर्णय क्र.मवैअ - १०५४/प्र.क्र.२४१/सेवा - ३ दि. १३/०६/२०१९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एम.बी.बी. एस. पात्रता धारकांना आदिवासी भागाकरीता ६०,०००/- इतके एकत्रित मानधन व इतर भागाकरीता ५५,०००/- इतके दरमहा मानधन दिले जाईल. तसेच विशेषतज्ञ यांना आदिवासी भागाकरीता ७०,०००/- इतके एकत्रित मानधन व इतर भागाकरीता ६५,०००/- इतके एकत्रित दरमहा मानधन दिले जाईल. तसेच शासन निर्णयात उर्वरित नमुद अटी व शर्ती बंधनकारक राहतील. वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु. १००/- स्टॅम्प पेपरवर करारनामा करणेत येईल.

उमेदवारांनी मुलाखतीस येताना सोबत एम.बी.बी.एस. व विशेषतज्ञ पदव्युत्तर पदवी / पदवीका यांचे सर्व वर्षाचे गुणपत्रिक, पदवीका / पदवी प्रमाणपत्र, वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलिकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकीत प्रतीचा ०१ संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादी सोबत घेऊन येणे आवश्यक आहे. उमदेवारांचे वय मुलाखतीच्या दिनांकास ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच अनाधिकृत गैरहजर असलेल्या/ संपामध्ये सहभागी असलेले / शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाही करीता काढुन टाकलेले वैद्यकीय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही. सदर भरती बाबतचे सर्व निर्णय घेणेचे सर्व अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवणेत आलेले आहेत.

अ ) शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस. अर्हता, विशेषतज्ञ पदासाठी (बालरोग, भिषक, शल्यचिकित्सक, बधीरीकरण, स्त्रीरोग तज्ञ इत्यादी तज्ञ पदांसाठी त्या त्या विषयातील पदव्युतर पदवी / पदवीका)

ब) मुलाखतीचा दिनांक व वेळ -०१/०१/२०२० सकाळी ९.०० ते १२.०० पर्यंत. (सदर मुलाखती वैद्यकीय अधिकारी यांची सर्व रिक्त पदे भरे पर्यंत दरमहा ०१ व १५ तारखेला घेणेत येतील. सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असलेस सुट्टीच्या दुसऱ्या दिवशी मुलाखती घेणेत येतील)

क ) मुलाखतीचे स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर.

स्वाक्षरी
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी कोल्हापूर

स्वाक्षरी
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हा शल्यचिकित्सक कोल्हापूर